# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ११-२३ दिनांक १२/०१/२०२३

## Insurance Policy Renewal करण्याच्या नावाने फसवणूक करणा-या आंतरराज्यीय टोळीस जेरबंद करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत रुम नं १५०६, १५ वा मजला, बिल्डींग नं ३० डी. बी. ओझोन, दहिसर पुर्व मुंबई ४०००६८ या ठिकाणी काही इसम नामांकित कंपन्यांची विमा पॉलीसीचे नावाने संपर्क साधून भारतातील नागरिकांची आर्थिक फसवणुक करीत असल्याबाबतची गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार मा. पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त यांचे आदेशानुसार पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर शाखेने छापा कारवाई केली.

**आरोपीतांची गुन्हे करण्याची कार्यपध्दती** :- नमूद आरोपी हे **ICICI Lombard Insurance** व इतर नामांकीत कंपन्यांचे ग्राहकांचा डेटा बेकायदेशीरित्या प्राप्त करतात. नमूद ग्राहकांना फोनद्वारे संपर्क साधून कंपनीचे प्रतिनिधी बोलत असल्याचे भासवून त्यांना पॉलीसी **Renew/Update/Surrender** करण्याकरीता **Scanner** पाठवून रक्कम **Housing.com/No Broker/Paytm/Freecharge** अशा वॉलेटमार्फत त्यांचे बँक खात्यात जमा करुन घेतात व तात्काळ एटीएम मधून काढून घेतात. तसेच ग्राहकांना बनावट पॉलीसीचे **pdf** फाईल पाठवून फसवणूक करतात. त्यामध्ये इतर ०२ जण कॉलर म्हणून कॉलींग करण्यासाठी मदत करीत असतात.

नमूद छापा कारवाई दरम्यान खालीलप्रमाणे आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे.

| अ.क्र. | आरोपीचे नाव, पत्ता |
|---|---|
| ०१ | सलिम अकबर सिध्दीकी वय २४ वर्षे रा.रुम नं १५०६, १५ वा मजला, बिल्डींग नं ३० डी बी ओझोन, केतकी पाडा, दहीसर पुर्व मुंबई ४०० ०६८ |
| ०२ | चांद वकील अहमद वय २६ वर्षे रा.आजमी नगर, नियर लाईफ लाईन मेडीकल, मालवणी, मालाड (वेस्ट), मुंबई - ४०० ०९५. |
| ०३ | मोहम्मद आफताब अशफाक शेख, वय - २२ वर्षे, रा. इरफान चौक, बिस्मील्लाह नगर, आजमी नगर, गेट -७ , गौरसिया मज्जीदच्या जवळ, मालवणी, खारोडी, मुंबई - ४०००९५. |

**आरोपींकडून हस्तगत मुद्देमाल :-** ०१ लॅपटॉप, १० मोबाईल, १० डेबिट कार्ड, ०१ चेकबुक, ०१ बँक पासबुक, ०३ आधारकार्ड

**गुन्हा नोंद तपशिल :-** काशिमिरा पोलीस ठाणे गु.रजि.नं २०/२०२३ भादंविसं कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ४१९, १२० ब सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ क, ६६ ड अन्वये दिनांक ११/०१/२०२३ रोजी ०६.३६ वाजता गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सदर आरोपीतांना मा. न्यायालयाने दिनांक १६/०१/२०२३ पावेतो तपासकामी पोलीस कोठडी मंजुर केली असून पुढील तपास काशिमीरा पोलीस ठाणे करीत आहेत.

**नमुद आरोपींचा खालील गुन्हयांमध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.**

| अनु .क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्र. व कलम |
|---|---|---|
| ०१ | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.रजि.नं. ०९/२०२३ भादंविसं ४२०,३४ प्रमाणे |
| ०२ | खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई शहर | गु.रजि.नं २१/२०२३ भादंविसं कलम ४१९,४२० सह आयटी ॲक्ट कलम ६६ (सी), ६६ (डी) |

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांडेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त यांचे आदेशावरून व श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त-गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्षाचे पोलीस निरीक्षक/सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, मपोहवा/१२००७ माधूरी धिंडे, पोअं/१२०९२ प्रविण आव्हाड, पोहवा/०६०३० राजवीर संधू, पोहवा ०७१५४ प्रविण पवार, म.सु.ब/राजेश भरकडे, महिला म.सु.ब.अश्विनी वाघमारे यांनी पार पाडली आहे.

-----oooo----